**उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकी अनुदानित महाविद्यालयातील अनुज्ञेय शिक्षकीय/शिक्षकेतर कर्मचारी व त्यांच्या कुटूंबियांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या अनुज्ञेयतीची कमाल मर्यादा व मंजूरीच्या अधिकारांमध्ये सुधारणा करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**

**शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क.३२५/मशि-५**

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक - ०२ ऑगस्ट, २०१९

<u>वाचा :</u>

१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक वैखप्र-२०११/प्र.क्र.३३३/२०११/राकावी-२ दि. १६ नोव्हेंबर, २०११.

२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक वैखप्र-२०११/प्र.क्र.१६/२०१६/राकावी-२ दि. १६ मार्च, २०१६.

३) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग संकीर्ण-२०१८/प्र.क.३२५/मशि-५ दि.११.०१.२०१९.

४) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक वैखप्र-२०१८/प्र.क्र.४८८/२०१८/राकावी-२ दि. ०६ जून, २०१९.

<u>प्रस्तावना</u> :-

राज्यातील उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकीय/शिक्षकेतर कर्मचारी व त्यांच्या कुटूंबियांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ मधील तरतूदींच्या अधीन राहून आकस्मिक उद्भवणाऱ्या २७ आजारांवर खाजगी रूग्णालायत घेतलेल्या उपलचारांवरील तसेच ५ गंभीर आजारावर संपूर्ण खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी शासनमान्य खाजगी रग्णालयात घेतलेल्या उपलचारावरील वैद्यकीय खर्चाच्या प्रत्येक प्रकरणी रू.३,००,००००/- च्या मर्यादेत प्रतिपूर्तीस मंजूरी देण्याचे अधिकार विभाग प्रमुखांना व रू. १,५०,०००/- च्या मर्यादेतील खर्चाच्या प्रतिपूर्तीस मंजूरी प्रदान करण्याचे अधिकार विभाग प्रमुखांना शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग संकीर्ण-२०१८/प्र.क.३२५/मशि-५ दि.११.०१.२०१९ अन्वये दिलेले आहेत. मात्र सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णय क्रमांक वैखप्र-२०१८/प्र.क्र.४८८/२०१८/राकावी-२ दि. ०६ जून, २०१९ अन्वये विभाग प्रमुखांना २,००,०००/- वरील व ३,००,०००/- पर्यंतच्या आणि वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती आणि रू. २,००,०००/- पर्यंतच्या प्रतिपूर्तीच्या देयकास मंजूरी देण्यात आली असून सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने हा शासन निर्णय त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व कार्यासने व कार्यालये यांना कळविण्याची व्यवस्था करण्याबाबतचे निर्देश दिलेले आहेत. तसेच त्यांच्या अधिपत्याखालील असलेल्या कार्यालयामध्ये विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख हे नेमके

कोणते पदधारक असतील याबाबत त्यांनी आकृतीबंधातील मंजूर पदनाम विचारात घेण्याबाबतचे निर्देश असल्यामुळे झालेल्या सुधारणांमध्ये बदल करण्याची व विभाग प्रमुख तसेच प्रादेशिक प्रमुख घोषित करण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वैखप्र-२०१८/प्र.क्र.४८८/२०१८/राकावी-२ दि. ०६ जून, २०१९ च्या शासन निर्णयामध्ये नमूद तरतूदींनुसार उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालयामध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकीय/ शिक्षकेतर कर्मचारी आणि त्यांच्या कुंटूंबियांनी घेतलेल्या उपचारापोटी केलेल्या खर्चाच्या प्रतिपूर्ती अनुज्ञेयतेच्या कमाल मर्यादेमध्ये वाढ करण्याबाबत व मंजूरीच्या अधिकारामध्ये विभाग प्रमुख व प्रादेशिक प्रमुख खालीलप्रमाणे घोषित करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

| पद | सक्षम प्राधिकारी | पूर्वीचे अधिकार | सुधारित अधिकार |
|---|---|---|---|
| विभाग प्रमुख | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे | रू.३,००,०००/- पर्यंत | रू.२,००,०००/- वरील परंतु रू.३,००,०००/- पर्यंतची प्रकरणे |
| प्रादेशिक प्रमुख | विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) | रू.१,५०,०००/- | रू.२,००,०००/- पर्यंतची प्रकरणे |

२. उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालयामध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकीय/ शिक्षकेतर कर्मचारी आणि त्यांच्या कुंटूंबियांनी घेतलेल्या उपचारापोटी केलेल्या खर्चाच्या प्रतिपूर्तीस मंजूरी देतांना सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक ०६ जून, २०१९ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

३. सदर शासन निर्णय हा निर्णयाच्या दिनांकास प्रलंबित प्रकरणांनाही लागू राहील.

४. सदरचे आदेश हे शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक वैखप्र-२०१८/प्र.क्र.४८८/२०१८/राकावी-२ दि. ०६ जून, २०१९ नुसार वाढविण्यात आलेल्या मर्यादेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०८०२१६१०५८१४०८ आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VINOD VASANT DALVI

Digitally signed by VINOD VASANT DALVI
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=167d8b62a8b227c6708ad19d0236d916621b12266f821ce1ff6d9338075be86b, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=d2d57fa10cc65ac1a845ff7c0dae7c15e11dcdf8cd69ffa5be719388a4e2c270, ou=MANTRALAYA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VINOD VASANT DALVI
Date: 2019.08.02 16:20:20 +05'30'

**( वि.व. दळवी )**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.

२. मा. मुंख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
४. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
५. सर्व मा.मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक
६. सर्व मा.विधानसभा सदस्य व विधान परिषद सदस्य
७. मा.मुख्य सचिव
८. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
९. सर्व विभागीय आयुक्त,
१०. सर्व जिल्हाधिकारी
११. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१२. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा/मूळ शाखा, मुंबई
१३. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१४. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१५. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६. मा. कुलगुरु, सर्व अकृषि विद्यापीठे.
१७. सर्व विभागीय सहसंचलाक, उच्च शिक्षण.
१८. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.
१९. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), नागपूर/मुंबई, महाराष्ट्र/मुंबई १/२.
२०. लेखा व अधिदान अधिकारी, मुंबई.
२१. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
२२. सर्व जिल्हा कोषाधिकारी यांची कार्यालये.
२३. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
२४. सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
२५. म.शि.५ कार्यासन, निवडनस्ती.